# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### चाकूर शहरात (जि.लातूर) ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र व ज्येष्ठ नागरीक भवन सुरु करण्याबाबत

**(१) ३३०७६ (०२-०२-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०१८ मध्ये ज्येष्ठ नागरीक धोरणांअंतर्गत ज्येष्ठांच्या विरंगुळा केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत नगरविकास विभागाला सुचना देण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकूर शहरात (जि.लातूर) ज्येष्ठ नागरीकांना विरंगुळयासाठी अद्यापही चाकूर नगरपंचायतीने कोणतीही सुविधा उपलब्ध करुन दिली नसून शहरात ज्येष्ठ नागरीकांसाठी एकही विरंगुळा केंद्र नसल्याचे दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरात सुमारे ४५० हून अधिक शिक्षक, प्राध्यापकासह ज्येष्ठ नागरीक असून ज्येष्ठांना बसण्यासाठी खुले मैदान वा प्रशस्त जागा वा ज्येष्ठ नागरीक भवन नसल्यामुळे ज्येष्ठांना बस स्थानकातील पडक्या ओटयाचा आधार घेऊन त्याठिकाणी सुसंवाद साधण्याची ज्येष्ठांवर पाळी आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चाकूर नगरपंचायत अस्तित्वात येऊन ५ वर्षे झालेली असताना व शासनाच्या धोरणानुसार नगरपंचायतीने विरंगुळा केंद्रासाठी विनामुल्य जागा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना तसेच नागरीक विरंगुळा केंद्रासाठी अनेक वर्षापासून ज्येष्ठ नागरीक मागणी करीत असतांना विरंगुळा केंद्र वा ज्येष्ठ नागरीक भवन अद्याप उभारण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, "चाकूर शहरात ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र अथवा भवन नसल्याने, शहरातील ग्रीन बेल्ट खुल्या जागेची पाहणी करण्यात येऊन विरंगुळा केंद्र अथवा भवन सुरु करण्यासाठी जागा विनामुल्य देण्यात येईल" असे नगरपंचायतीच्या मा.मुख्याधिकारी यांनी सांगितले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशतः खरे आहे.

सद्य:स्थितीत नगरपंचायत सांस्कृतिक सभागृह येथे ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करुन तेथे बसण्यासाठी व वाचनासाठी व्यवस्था केली आहे. तसेच नव्याने निर्माण होत असलेल्या गार्डनमध्ये ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी ट्रॅक, ओपन जिम व चिल्ड्रन पार्क करणे या कामांकरीता नगरपरिषदेमार्फत आरोही कंस्ट्रक्शन ॲन्ड सप्लायर्स, चाकूर यांना दि.२७.०१.२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

(५) अंशतः खरे आहे.

ज्येष्ठ नागरिकांकरीता विरंगुळा केंद्रासाठी जागा उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करण्यात येईल, असे मुख्याधिकारी, चाकूर नगरपंचायत यांनी सांगितले होते, ही बाब खरी आहे.

(६) ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी ट्रॅक व बसण्यासाठी बेंचेसची सोय करण्याकरीता नगरपरिषदेमार्फत आरोही कंस्ट्रक्शन ॲन्ड सप्लायर्स, चाकूर यांना दि.२७.०१.२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील प्रकल्पांच्या पुनर्वसनाबाबत

**(२) ३३१५४ (१७-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या प्रलबिंत प्रश्नांबाबत मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ जुन, २०२१ रोजी वा त्यासुमारास बैठक घेण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील नागणवाडी, सर्फनाला, धामणी व आंबेहोळोळ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे प्रश्न जलद गतीने सोडविण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, तुळशी (ता.राधानगरी) मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना ४० वर्षापुर्वी वाटप करण्यात आलेल्या देवस्थानच्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करण्याकरीता जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांचे मार्फत शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आल्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) तुळशी (ता. राधानगरी) मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना ४० वर्षापुर्वी वाटप करण्यात आलेल्या देवस्थानच्या जमिनी शेतक-यांच्या नावे करण्याकरीता जिल्हाधिकारी कोल्हापूर, यांनी याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांचे मार्फत शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. या अनुषंगाने तुळशी, ता. राधानगरी मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना सन १९७६ कालावधीत देवस्थान जमिनी संपादीत न करता एकसाल पध्दतीने देण्यात आलेल्या आहेत, अशा प्रकारच्या एका प्रकल्पग्रस्ताच्या न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने सदर जमिन वर्ग- २ मधून वर्ग- १ करणे संदर्भात प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने सदर प्रकल्पग्रस्तास महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १४.०६.२०२२ नुसार अन्य पर्यायी जमीन भूसंचयामधून वाटप करण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर- तुळजापुर-उस्मानाबाद या महत्वाकांक्षी रेल्वे मार्गांसाठी केंद्र शासनाने राज्य शासनाचा ५० टक्के निधी देण्याबाबत

**(३) ३३६२८ (१२-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलस्वामीनी श्री आई तुळजाभवानी (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) मातेच्या दर्शनासाठी परराज्यातून व देशभरातुन लाखो भाविक दर्शनास येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाविक/भक्तांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून केंद्र शासनाकडून सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद या रेल्वे मार्गास ५०-५० टक्के (म्हणजे केंद्र शासनाच्या हिस्सा ५० टक्के व राज्य शासनाचा हिस्सा ५० टक्के) या धर्तीवर रेल्वे मार्ग मंजुर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद या रेल्वे मार्गास राज्य शासनाच्या हिस्स्याचा ५०% निधी देणेबाबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिंधीनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाने या मार्गांसाठी सन २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. २२ कोटीची तरतुद केलेली केली असल्याने राज्य शासनाच्या वाट्याचा ५० टक्के निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य अभियंता, सा.बां. विभाग, उत्तर मध्य रेल्वे, सीएसएमटी, मुंबई यांनी पत्र क्र. ईडब्ल्यू/१६६/बीए/ईबीआर (एफयु)/२०२१-२२ दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी व त्याआधीदेखील पत्राद्वारे निधीची तरतुद करण्याबाबत वारंवार विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सोलापूर-तुळजापुर-उस्मानाबाद या रेल्वे मार्ग ५०-५० टक्के हिस्सा प्रमाणेच राज्यातील नगर, बीड, परळी, पुणे नगर, नाशिक हे रेल्वे मार्ग देखील केंद्र शासनाने मंजुर केले होते, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तुळजापुर मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्साचा निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०३-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) केंद्र शासनाने या रेल्वे मार्गासाठी सन २०२१-२२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. २० कोटी निधीची तरतुद केली होती असे रेल्वेने कळविले आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या वाट्याचा ५० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य अभियंता, सा. बां. विभाग, उत्तर मध्य रेल्वे, सीएसएमटी, मुंबई यांनी दिनांक १२.०७.२०२१ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.
(५) होय.
(६) सोलापूर-तुळजापुर-उस्मानाबाद या नवीन रेल्वेमार्ग प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा ५०% आर्थिक सहभाग घेण्याबाबतचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २९.११.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १०.०२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड (जि.बीड) नगरपरिषदेमार्फत सर्वसाधारण सभा/विशेष सभा, स्थायी समिती सभांमध्ये मंजूर झालेले ठराव व इतिवृत्त संकेतस्थळावर टाकण्यात येत नसल्याबाबत**

**(४) ३५१७७ (०१-०२-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार बीड नगरपरिषदेने सन २०१० ते २०१५ आणि २०१६ ते २०२० या कालावधीत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा, स्थायी समितीच्या सभा तसेच या सभांमध्ये विविध स्वरुपाचे ठराव मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व सभांच्या नोटीसा (सुचनापत्र) सभेपूर्वी मा.सदस्यांना दिले जात नसल्याचे तसेच सर्वसाधारण सभा/विशेष सभा, स्थायी समिती सभांमध्ये मंजूर झालेले ठराव व इतिवृत्त संकेतस्थळावर टाकणे शासन आदेशानुसार बंधनकारक असतांना ते संकेतस्थळावर (अपलोड) जाणीवपूर्वक टाकण्यात येत नसल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कालावधीत सर्व सभांमध्ये मंजूर झालेले ठराव, बैठकांची सुचनापत्रे इत्यादींची मा.लोकप्रतिनिधी व नगरसेवक यांनी त्यांचे पत्राद्वारे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान वारंवार मागणी करुन त्याबाबतची माहिती अद्याप त्यांना पुरविण्यात आली नसून व याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद व जिल्हाधिकारी, बीड तसेच प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे तक्रार निवेदने देऊनही अपेक्षित माहिती प्राप्त झाली नसल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुसार शासन आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या नगरपरिषदेचे नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड व अन्य संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सर्वसाधारण सभेच्या नोटीस सात दिवस अगोदर व विशेष सभेच्या नोटीस तीन दिवस अगोदर सदस्यांना देण्यात येतात. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि.०४ मे, २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर ठराव व इतिवृत्त प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.०५ डिसेंबर, २०२० रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या मागणीनुसार सर्व सभांमध्ये मंजूर झालेले ठराव, बैठकीचे सूचनापत्रे इत्यादी बाबतची माहिती मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी त्यांच्या दि.०८.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुरविण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील सिताफळ उत्पादकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५) ३५३७२ (१२-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील प्रसिध्द सिताफळाला टाळेबंदीमुळे बाजारभाव कमी मिळाल्यामुळे येथील सिताफळ उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने पुरंदर तालुक्यातील सिताफळ उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमधील सिताफळाची माहे जानेवारी,२०२० मध्ये आवक ४३७९ क्विंटल व सर्वसाधारण दर रु.४९७३ प्रति क्विंटल होता व माहे जानेवारी, २०२१ मध्ये या दरामध्ये वाढ दिसून येते.

तसेच, कृषि उत्पन्न बाजार समिती निरा, उपबाजार सासवड (पुरंदर) या बाजार समितीमध्ये सप्टेंबर, २०२० ते मार्च, २०२१ या कालावधीतधील आवक निरंक आहे. त्यामुळे सिताफळाला बाजारभाव कमी मिळाल्यामुळे सिताफळ उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३ ) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणात दरवर्षी लागणाऱ्या वणव्यातील आंबा-काजू बागायतदार नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याबाबत

**(६) ३८०१८ (०९-०४-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात, प्रामुख्याने रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्हयात दरवर्षी वणव्यांमुळे आंबा, काजूच्या बागा होरपळून शेतकरी-बागायतदारांना मोठे नुकसान सहन करावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वणव्यांत नुकसान झालेल्या शेतकरी-बागायतदारांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
रायगड जिल्ह्यात दि.२१.०४.२०२२ रोजी मौजे वळवली, ता.अलिबाग येथे शेतातील राब जाळल्याने वणवा पेटुन आठ शेतकरी यांच्या आंब्यांच्या झाडांचे नुकसान झाले आहे.

(२) शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३.०५.२०१५ व शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१७ / प्र.क्र.२६७ /म-३ दि.२५.०१.२०१८ नुसार वणवा पेटुन झालेले नुकसान भरपाई देण्याबाबतची तरतुद नसल्याने संबंधित बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंठा (जि.जालना) तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(७) ३९९६८ (०९-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीपोटी जाहिर केलेल्या अनुदानाची रक्कम अद्यापपावेतो मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसिल कार्यालयामार्फत शासनाकडे जवळपास १३ कोटी रुपयांची मागणी करुनही शासनाकडून अनुदानाची रक्कम कमी प्रमाणात मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांना ही रक्कम मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय महसूल व वन विभाग दि.२६.१०.२०२१ व दि.१६.०२.२०२२ अन्वये अनुक्रमे रुपये २८६०.८४ कोटी व रुये १०३५.०० कोटी असे एकूण रुपये ३८९५.९४ कोटी एवढा निधी सर्व विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी जालना जिल्हयासाठी रुपये ५१८.३४ कोटी निधी वितरीत केला आहे.
जालना जिल्हयास प्राप्त झालेल्या निधीमधून रुपये ५२.६८ कोटी एवढा निधी मंठा तालुक्यासाठी वितरीत केला होता. त्यापैकी रुपये ५१.७३ एवढा निधी बाधित शेतक-यांना वितरीत केला आहे. उर्वरित रु.०.९४ कोटी इतका निधी शासनास समर्पित केलेला आहे. एकही बाधित शेतकरी अनुदानापासून वंचित राहिला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमधील विक्रोळी (पुर्व) गोदरेज कंपनीजवळील जागेवर**
**कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्याबाबत**

**(८) ४००३० (०९-०४-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमधील विक्रोळी (पुर्व) गोदरेज कंपनीजवळील जागेवर कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्याचा निर्णय मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांनी घेवून त्या ठिकाणी उद्घाटन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी त्याच ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
मुंबईमधील विक्रोळी पूर्व गोदरेज कंपनी जवळील जागेवर कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्याबाबत मागणी अथवा निवेदन क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाकडून ३७० पदे इतर मागास बहुजन कल्याण (ओ.बी.सी.) विभागाकडे वर्ग करण्यात आली नसल्याबाबत**

**(९) ४००३७ (०९-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८ मध्ये सामाजिक न्याय विभागातून इतर मागास बहुजन कल्याण (ओ.बी.सी.) विभाग वेगळा केल्यानंतरही सामाजिक न्याय विभागाकडून ३७० पदे ओबीसी विभागाकडे वर्ग केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदे वर्ग न केल्याने सर्व पदे प्रतिनियुक्ती तसेच हंगामी स्वरुपात भरली जात असल्याचे निदर्शनास आले आहेत त्यामुळे ओबीसी विभागातील कामामध्ये विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही पदे वर्ग करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर ३७० पदे ओबीसी विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) सामाजिक न्याय विभागाचा आकृतिबंध सन २००४ च्या शासन निर्णयानुसार मंजुर आहे. त्यामध्ये सुधारणाकरून सुधारीत आकृतिबंध वित्त विभागास सादर केला आहे. सदर आकृतिबंधामध्ये इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाकडे वर्ग करावयाच्या २९४ पदांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात समाजकल्याण विभागातील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१०) ४०५५१ (०९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात समाजकल्याण विभागात जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवरील शासनाच्या मंजूर १० पदांपैकी ७ पदे रिक्त असून कंत्राटी पध्दतीवर घेण्यात आलेल्या ९ पदांपैकी ५ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असल्यामुळे समितीच्या अधिकाऱ्यांवर अतिरिक्त भार पडत असून जात पडताळणी प्रमाणपत्राची महिना अखेर २१ हजार ३४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे शैक्षणिक सेवाअंतर्गत, निवडणूक, जात,पडताळणीधारक नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन तातडीने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सामाजिक न्याय विभागाचा आकृतिबंध सन २००४ च्या शासन निर्णयानुसार मंजुर आहे. त्यामध्ये सुधारणा करून सुधारीत आकृतिबंध वित्त विभागास मान्यतेस्तव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय बहुउद्देशीय दिव्यांग संमिश्र केंद्र वर्धा येथील परिचर या पदाचे प्रलंबित वेतनाबाबत**

**(११) ४०५५९ (०९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय बहुउद्देशीय दिव्यांग संमिश्र केंद्र वर्धा येथील श्री.बी.टी. आसुटकर, (परिचर पद ) यांचे प्रलंबित वेतनाबाबत सामाजिक न्याय मंत्री महोदयांना व प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.आसुटकर हे शासकीय बहुउद्देशिय दिव्यांग संमिश्र केंद्र वर्धा येथे सन १९९४ पासून कार्यरत असून सन २०१८ पासून प्रतिनियुक्तीवर असताना त्यांचे सर्व शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे २२ पदांची ऑनलाईन नोंदणी अपेक्षित असताना २१ पदांचीच नोंदणी झाल्याने परिचर पदाची नोंदणी झाली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.आसुटकर यांना माहे मार्च, २०१९ पासून चे वेतन न मिळाल्याने त्यांची व कुटुंबियांची उपासमार होऊ लागली आहे, हे ही खरे काय,
( ४) असल्यास, परिचर पदाची नोंदणी करून श्री.आसुटकर यांना मागील २० महिन्यांपासूनचे थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) दिव्यांग कल्याण आयुक्तालयाअंतर्गातील शासकीय बहुउद्देशिय दिव्यांग समिश्र केंद्र, वर्धा येथील परिचर हे पद वित्त विभागाच्या ३०.०२.२०१९ रोजीच्या सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेमध्ये व सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट नसल्यामुळे श्री. बी. टी. आसुटकर, परिचर यांना समायोजनाने समकक्ष वेतन श्रेणीतील शिपाई या पदावर शासकीय बहुउद्देशिय दिव्यांग समिश्र केंद्र, वर्धा येथे पदस्थापना देण्यात आली आहे. त्यानुसार श्री. आसुटकर हे शिपाई या पदावर दिनांक ०१.०६.२०२१ रोजी (म. पु.) रुजु झाले असून त्यांचे मार्च, २०१९ पासून प्रलंबित असलेले वेतन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून अदा करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निसर्ग व तौक्ते वादळामुळे मुंबईतील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१२) ४२३७३ (०९-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निसर्ग व तौक्ते वादळामुळे मुंबईतील अनेक भागामध्ये प्रचंड नुकसान झाले असून नुकसानीचे पंचनामे करुन देखील अद्यापपर्यंत नुकसानग्रस्तांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचनामे केलेल्या ठिकाणी किती रुपयांचे नुकसान झाले याची नोंद शासन दफ्तरी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) खरे नाही.

(२) व (३) होय

निसर्ग चक्रीवादळामुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शेतीपिकांच्या व मालमत्तेच्या नुकसानीकरिता संबंधित विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार एकूण रु.७६५.०१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधीपैकी विभागीय आयुक्त, कोकण यांनी मागणी केल्यानुसार मुंबई उपनगर जिल्ह्याकरिता रु.०.७५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तर तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या शेतीपिकांच्या तसेच मालमत्तेच्या नुकसानीकरिता संबंधित विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार एकूण रु.१८९.६२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधीपैकी मुंबई शहर व मुंबई उपनगरमध्ये झालेल्या नुकसानीकरिता रु.७.२५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घिवली (जि. पालघर) गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१३) ४३९३५ (०९-०४-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाभा अणु संशोधन केंद्राने (बीएआरसी) यांनी संपादित केलेल्या जमिनीवर कुंपण (सुरक्षा भिंत) उभारण्याचे काम सुरु केल्याने पालघर जिल्ह्यातील घिवली गावातील सुमारे ७५ शेतकऱ्यांना गावातून शेतामध्ये जाण्याचा रस्ता कायमस्वरुपी बंद होणार असल्याने गावातील २ विहीरी व दलित वस्तीचा गावाशी संपर्क तुटणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतात जाण्यासाठी असलेला रस्ताच बंद होणार असल्याने शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन उपलब्ध होणार नाही तसेच दलित वस्तीचा गावाशी संपर्क तुटणार असल्याने घिवली गावातील दलित, शेतकरी व ग्रामस्थांनी पालक मंत्री महोदयांची भेट घेऊन गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या पालक मंत्री महोदयांनी अप्पर जिल्हाधिकारी यांना दिलेल्या सुचनेनुसार अप्पर जिल्हाधिकारी यांनी पालघरचे उपविभागीय अधिकारी (प्रांत) यांना प्रत्यक्ष पाहणी करुन त्याचा अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास अहवालाच्या शिफारशी काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी घिवली गावाचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) भाभा अणु संशोधन (बीएआरसी) प्रकल्पाकडून सुरक्षा भिंत उभारण्याचे काम सुरु केल्याने, मौजे घिवली, ता. पालघर येथील ग्रामस्थांनी गावातून शेतामध्ये जाण्याचा रस्ता कायमस्वरुपी बंद होणार असल्याचे नमुद करुन, न्याय मिळणेबाबत मा. पालकमंत्री , जिल्हा पालघर यांना निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.पालकमंत्री यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयामार्फत प्रकल्पबाधित शेतकरी व भाभा अणु संशोधन केंद्र यांचेकडील संबंधित अधिकारी यांचेसमवेत बैठक आयोजित करणेत आली होती. तसेच सदर बैठकीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पालघर यांनी संबंधितांसमवेत प्रत्यक्ष स्थळपाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, सदर प्रकरणी अतिरिक्त निवेदन व जादा माहिती ग्रामस्थ तसेच भाभा अणु संशोधन केंद्राचे अधिकारी देणार आहेत. त्यानुसार अतिरिक्त माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

**सायगांव (एकबे ) (ता. कोरेगांव, जि.सातारा) येथील ग्रामस्थांना गावठाण कब्जेपट्टी देण्याबाबत**

**(१४) ४३९५३ (०९-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायगांव (एकबे) (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील ग्रामस्थांना सन १९७८ पासून गावठाण कब्जेपट्टी देण्यात आली नसून गावठाणाचा सातबाराही झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कब्जेपट्टा देण्याकरिता शासनाने २० टक्के विलंब शुल्क लावला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू विलंब शासनाच्या दुर्लक्षामुळे झाल्याने विलंब शुल्क माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, नविन शर्त (सातबारावरील) उठवून गावठाणाचा सिटी सर्व्हे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदरहू गावठाणातील ग्रामस्थांना नविन शर्त उठवून संबधित खातेवारसांना कब्जेपट्टी व सातबारा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

सायगांव (एकबे) (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील पुनर्वसन गावठाणांच्या भूखंडाचा कमी जास्त पत्रक झालेले नसल्यामुळे येथील ग्रामस्थांना कब्जेपट्टी देण्यात आलेली नाही. मात्र सद्यास्थितीत गावठाणाचा एकच ७/१२ तयार करणेत आला असून त्यावर सर्व भूखंडधारकांच्या नावाची नोंद करणेत आलेली आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) स्वतंत्र सातबारा झालेनंतर नविन शर्त असलेल्या सातबारा वरील शर्त उठविणेबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही जलद गतीने करणेची दक्षता घेत आहोत.

(५) सहाय्यक संचालक नगर रचना सातारा यांचेकडील तात्पुरता रेखांकन नकाशाप्रमाणे जागेवर मोजणी पूर्ण करुन उपअधिक्षक भूमी अभिलेख कोरेगांव यांचेकडील प्राप्त नकाशानुसार सहाय्यक संचालक नगर रचना सातारा यांचेकडून अंतिम रेखांकन आराखड्यास मान्यता मिळालेली असून सदर रेखांकन आराखड्यानुसार भुखंडाचा ७/१२ तयार करणेस हरकत असलेबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांचे वैयक्तिक सुनावणी व बैठक घेवून पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

---

**राज्यातील धरणे व जलसाठ्यांच्या साठवण क्षमतेत वाढ करणेबाबत**

**(१५) ४४८७६ (११-१०-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणे व जलसाठ्यांच्या साठवण क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने धरणांमधील गाळ काढून शेतात वापरण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ३ मे, २०१७ रोजी घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापर्यंत कोणत्या धरणांमधील किती गाळ काढण्यात आला याची माहितीच प्रशासनाकडे नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णयाची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२३) :** (१) व (२) राज्यातील धरणे व जलसाठ्यांच्या साठवण क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने धरणांमधील गाळ काढून शेतात वापरण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्याबाबतचा

शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील ८५०४ धरणांमधून ७,१७,८२,६४१ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुर्नविकास करण्याबाबत

**(१६) ४५७४१ (०९-१०-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना कृष्णा खोऱ्यात समाविष्ट असलेल्या अथवा लगतच्या जिल्ह्यातच त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता जमिनीचे वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जमिनी कोणत्या जिल्ह्यात वा परिसरात देण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, सदर जमिन वाटपाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १४.०६.२०२२ नुसार प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप बाबतची कार्यपध्दती / प्राधान्यक्रम विहीत करण्यात आलेला आहे.
(३) उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी जमीनीची मागणी केल्यानंतर संबंधित प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राच्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पात्रतेबाबत अहवाल मागवून विहीत कार्यपध्दती/ प्राधान्यक्रमानुसार पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाही करणेत येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूरच्या कचरा डेपोतील गैरकारभार, अस्वच्छता व बेकायदेशीरपणा याबाबत हरित लवादाने सोलापूर महापालिकेला नोटीस जारी केल्याबाबत

**(१७) ४५७९४ (१७-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील कचरा डेपोतील गैरकारभार, अस्वच्छता व बेकायदेशीरपणा या संदर्भातील पर्यावरणहीत याचिकेची गंभीर दखल घेऊन हरित लवादाने सोलापूर महापालिकेला नोटीस जारी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर बायो एनर्जी प्लांट यांना सहा आठवड्यांत म्हणणे मांडण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) सोलापूर महानगरपालिकेकडून कचरा डेपो येथे जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रकल्पाचे माध्यमातून प्रक्रिया करण्याचे काम कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तसेच अंतर्गत रस्ते बांधणी, लिचेट टँक उभे करण्याचे काम

प्रगतीपथावर आहे. शहरात निर्माण होणाऱ्या दैनंदिन कचऱ्यावर प्रक्रिया करुन उर्वरित वापरात न येणाऱ्या कचऱ्याचे सॅनिटरी लॅण्ड फिलिंग करण्यासाठी तांत्रिक मान्यता घेण्याचे काम सुरु असून लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांताक्रुझ (पूर्व ) मुंबई येथील हंस भुग्रा रोड लगत असलेली मल:निसारण वाहिनी सर्व्हिस रोडवर स्थलांतरीत करण्याबाबत**

**(१८) ४५८९२ (२५-०९-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ (पूर्व) मुंबई येथील हंस भुग्रा रोड लगत विद्यापीठाच्या प्रवेशद्वारा (रस्त्याच्या दक्षिण बाजुला) पासून पश्चिम द्रुतगती मार्गपर्यत अस्तित्वात असलेली ६०० मि.मि. व्यासाची मलःनिसारण वाहिनी कार्यान्वित करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी मा.पर्यटन, मा.पर्यावरण मंत्रीमहोदय व संबंधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात एम.एम.आर.डी ए. व संबंधित विभागाशी मा.मंत्री महोदयांच्या दालनात दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी बैठक व पाहणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने वाकोला नदी, वाकोला पाईप लाईन या दरम्यानची मलःनिसारण वाहिनी मायक्रोटनलिंग पध्दतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणाऱ्या सर्व्हिस रोडवर स्थलांतरित करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मुंबई विद्यापीठाच्या प्रवेशद्वारापासून पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंत प्रस्तावित ६०० मि.मि. व्यासाच्या व ५८६ मीटर लांबीच्या मल: निसारण वाहिनीचा काही भाग भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या जागेतून जात असल्याने संरक्षण मंत्रालयाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त झाल्यानंतर व सदर जागेचे भुसंपादन झाल्यानंतर मल: निसारण वाहिनीचे बांधकाम करण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत संरक्षण विभाग, भारत सरकार यांच्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाकडे पाठपूरावा सुरु आहे.

---

**मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते एलिफंटा या दरम्यानच्या समुद्रातील कचऱ्याची स्वच्छता करण्याबाबत**

**(१९) ४६१९३ (१७-०९-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ते एलिफंटा या दरम्यानच्या समुद्रात मोठया प्रमाणात प्लास्टिक कचरा तरंगताना आढळून आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा मार्ग पर्यटकांच्या दृष्टीने महत्वाचा असून हजारो पर्यटक बोटीने ये-जा करीत असल्यामुळे समुद्रातील कचऱ्याची स्वच्छता करण्याबाबत प्रशासनाने कोणत्या उपाययोजना किंवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यास्तरावर गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा या जलमार्गावर चालणा-या सर्व प्रवासी बोटींमध्ये कचरा गोळा करण्यासाठी डस्टबिनची व्यवस्था करण्याबाबत व प्रवासी बोटीतून प्रवास करतेवेळी कचरा बोटीतील डस्टबिनमध्येच टाकण्या संदर्भात जनजागृती करण्याबाबत प्रादेशिक बंदर अधिकारी, मोरा बंदरे समुह

यांनी दि. २३/१२/२०२१ च्या पत्रान्वये गेटवे ऑफ इंडिया येथील प्रवासी जलवाहतूक संस्थांना कळविण्यात आले आहे. प्रवासी जलवाहतूक करणाऱ्या बोटींची महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत वेळोवेळी आकस्मित तपासणी करण्यात येते, ज्यामध्ये प्रवासी सुरक्षिततेची साधने तसेच कचरा व्यवस्थापनाच्या उपाययोजनांची देखील तपासणी करण्यात येते व त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याबाबत संबधित बोटमालक, संस्थाचालक व कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील विमानतळ कार्यान्वित करण्याबाबत**

**(२०) ४६२८८ (२५-०९-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील होटगी मार्गावरील सुसज्ज असलेल्या विमानतळावरील विमानसेवा दीर्घकाळपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर शहर हे आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या राज्याच्या सीमेलगत असल्याने तसेच सोलापूर शहरात व जिल्ह्यात अनेक प्रसिद्ध धार्मिक स्थळे असूनही हवाई प्रवासाच्या सुविधेअभावी पर्यटन व उद्योग व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर शहरातील कार्यान्वित नसलेले विमानतळ अद्ययावत करुन राज्यातील व देशातील विमानतळांना जोडले जाण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हवाई प्रवासांच्या सुविधेअभावी पर्यटन व उद्योग व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे असे निश्चित म्हणता येणार नाही. तथापि सोलापूर शहरासाठी विमानसेवा सुरू झाल्यास पर्यटन व उद्योग व्यवसायास चालना मिळू शकेल.
(३) सोलापूर शहरातील होटगी मार्गावरील विमानतळ भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे आहे. सध्या श्री. सिध्देश्वर सहकारी साखर कारखानाच्या चिमणीसह धावपट्टीच्या ॲप्रोच मार्गातील अडथळयाचा मुद्दा महासंचालक नागरी विमान वाहतूक (DGCA) द्वारे पुनरावलोकन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगांव ( जि.जळगांव ) तालुक्यात वादळी पावसात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत**

**(२१) ४६७९७ (१४-१०-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव ( जि.जळगांव ) तालुक्यात दिनांक ११ जून, २०१९ ला झालेल्या वादळी पावसात झालेल्या नुकसानीचे पंचनामे होऊनही आजपर्यंत या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळाली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांच्या समवेत दिनांक २६ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या दालन बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत नव्याने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनेनुसार दि.२९.४.२०२२ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, तसेच या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केव्हापर्यंत नुकसान भरपाई देणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) तत्कालीन मंत्री (मदत व पुनर्वसन) यांनी दिलेल्या निर्देशावरुन विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या कडून प्राप्त झालेला प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समितीच्या दि.१४.१०.२०२२ रोजीच्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी निकषाची पूर्तता होत नसल्याने राज्य कार्यकारी समितीने प्रस्ताव अमान्य केला आहे. सबब, सदर प्रकरणी बाधित शेतकऱ्यांना मदत अनुज्ञेय नाही.

---

**बीड नगरपरिषदेच्या अधिनस्त असलेल्या कामांचे अनधिकृत उद्घाटन करुन अनियमितता करण्यात आल्याबाबत**

**(२२) ४७५१६ (२८-०९-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड नगरपरिषदेवर दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी शासनाने काढलेल्या आदेशानुसार दिनांक २३ मार्च, २०२१ रोजीप्रमाणे बीड नगरपरिषदेवर दिनांक १६ जानेवारी, २०२२ रोजीपासून बीड उपविभागीय अधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे असतांना नगरपरिषदेचे माजी नगरपरिषद अध्यक्ष व माजी नगरसेवक व त्यांचे सहकारी यांनी बेकायदेशीररित्या तेथील भोईगल्ली परिसरात अंतर्गत सिमेंट रस्ते व नाली कामाचे उद्घाटन, बीड तालुक्यातील ईट येथे बीड नगरपरिषदेच्या जलशुध्दीकरण केंद्र येथे जलपुजन करणे, प्रभाग क्र.१ मध्ये माळीगल्ली येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम या कामाचे उद्घाटन, प्रभाग क्र.२५ येथील प्रकाश आंबेडकरनगर, ढगे कॉलनी, अशोकनगर येथील सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचे उद्घाटन या व अशा इतर बाबी तसेच शिंदेनगर कमान ते द्वारकानगरी मुख्य रस्त्याचा उद्घाटन समारंभ नगरपरिषदेचे प्रशासनाद्वारे पार पाडण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन परिपत्रक, दिनांक ४ जून, २०११ व इतर शासन परिपत्रकाचे अन्वये कार्यवाही न करता नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी, नगरपरिषदेचे कर्मचारी, माजी नगरपरिषद अध्यक्ष व माजी नगरसेवकांच्या बेकायदेशीर होत असलेल्या व कसल्याही प्रकारची सदरील कामांची प्रमाण, कार्यारंभ आदेश नसतांना देखील जनतेची व प्रशासनाची दिशाभुल करण्यात आल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील झालेली उद्घाटने, कार्यारंभ आदेश हे शासन निकषानूसार व परिपत्रकाप्रमाणे करण्यात आले नसून ते बेकायदेशीर व घटनाबाह्य असल्याचे निदर्शनास आणून त्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाने या सर्व घटनांची तपशिल व स्तरनिहाय चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत त्यांचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.सामाजिक न्याय मंत्री, बीड जिल्हा पालकमंत्री, राज्यमंत्री, नगरविकास, विभागीय आयुक्त, औरंगाबाद, जिल्हाधिकारी, बीड प्रशासक, बीड नगरपरिषद यांना कळविण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) माजी पदाधिकाऱ्यांकडून लोकार्पण सोहळा/ उद्घाटनाचे कार्यक्रम घेतल्यास त्यांच्याविरुद्ध करावयाच्या कारवाईबाबत नगरपालिकेच्या पॅनलवर नियुक्त विधिज्ञांच्या कायदेशीर सल्ल्यानुसार, तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि.०४.०६.२०११, दि.१७.०१.२०१४ व दि. २७.०७.२०१५ मधील तरतूदीनुसार पुढील कारवाई

करण्याबाबत अपर जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी दि.०१.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांना सूचित केले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वडवणी (जि.बीड) शहरातील विद्युतीकरण करण्याबाबतची कामे न करताच देयके अदा केल्याबाबत**

**(२३) ४८१२५ (३०-१०-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडवणी (जि.बीड) शहरातील वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुद योजनेअंतर्गत विद्युतीकरण करण्याबाबतची कामे न करताच देयके अदा केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे, २०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी नगरपरिषद, माजलगाव जि.बीड यांना चौकशी करून अहवाल देण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राप्त अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०३-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.
याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांचे दि.२० फेब्रुवारी, २०२१ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयास दि.१५ एप्रिल, २०२१ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.१५ एप्रिल, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, वडवणी नगरपंचायत यांना कळविण्यात आले होते. तथापि, मुख्याधिकारी, वडवणी नगरपरिषद यांच्याकडून अहवाल प्राप्त न झाल्याने, जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत दि.०५ डिसेंबर, २०२२ रोजी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.
तसेच सदर प्रकरणाचा तात्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने दि.०७ डिसेंबर, २०२२ रोजी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्या स्तरावर चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अधिकारी कर्मचारी यांचा समावेश कोविड योद्धा म्हणून करून त्यांना लाभ देण्याबाबत**

**(२४) ४९०४५ (१४-१०-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महसूल विभागासह इतर सर्वच विभागातील अनेक कर्मचाऱ्यांचे कोविड १९ मुळे मृत्यू झाला असून त्यांना कोविड योद्धा म्हणून घोषित करून ५० लक्ष रुपये सानुग्रह अनुदान देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी माहे मे, २०२२ वा त्यादरम्यान मा. मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोव्हिड विषाणूच्या सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध चाचणी, उपचार व मदत कार्य याकार्यवाहीशी संबंधित कर्तव्यावर कार्यरत सर्व कर्मचा-यांना रु.५० लक्ष रकमेचे सर्वकष वैयक्तिक अपघात विमा कवच पुरविण्याबाबत वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण२०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दि.२९ मे, २०२० अन्वये मार्गदर्शक

सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये अद्यापि, वित्त विभागाने कोणताही बदल केलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या विविध खात्यांमध्ये कार्यरत लोकसेवकास लाच घेताना अटक केल्यास तीन महिन्यानंतर पुन्हा ड्युटीवर बोलविल्याबाबत

**(२५) ४९२३५ (३१-१०-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या विविध खात्यांमध्ये कार्यरत लोकसेवकास लाच घेताना अटक झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध तीन महिन्यांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होताच लगेच ड्युटीवर बोलावले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होईपर्यंतच्या काळात लाच घेतल्याप्रकरणी अटक कर्मचाऱ्यास अर्धा पगार दिला जातो मात्र तीन महिन्यानंतर लगेच ड्युटीवर बोलावून पूर्ण पगार अदा केला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी लाच प्रकरण संबंधित लोकसेवकाचे निर्दोषत्व सिद्ध होईपर्यंत त्यास कामावर घेतले जात नव्हते, तथापि, निर्दोष सिद्ध झाल्यास निलंबन काळातील पूर्ण वेतन अदा केले जात होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

न्यायालयीन प्रकरणी निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यास त्याच्या निलंबन कालावधीत विहित केलेल्या दराने निर्वाह भत्ता दिला जातो. तसेच आढाव्याअंती निलंबन संपुष्टात आणण्याचा निर्णय झाल्यास, तो पदावर पुन:स्थापित झाल्याच्या दिनांकापासून पूर्ण वेतन दिले जाते.
(३) लाच स्वीकारण्याच्या प्रकरणी शासकीय सेवकाविरुध्दचे न्यायालयातील फौजदारी प्रकरण पूर्ण होऊन अंतिम निर्णय लागेपर्यंत त्यास सर्वसाधारणपणे निलंबितच ठेवण्यात यावे, त्याचे निलंबन संपुष्टात न आणता त्याचेविरुध्दच्या न्यायालयीन प्रकरणामधील अंतिम निर्णयाची वाट पहावी अशा स्वरुपाची तरतूद शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.१४.१२.१९९५ अन्वये करण्यात आली होती.

तसेच कर्मचाऱ्याचे निर्दोषत्व सिध्द झाल्यास, निलंबन कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून नियमित केल्यानंतर, लांबलेल्या निलंबन कालावधीचा संबंध कर्मचाऱ्याशी जोडता येण्यासारखा नसेल तर त्यास निलंबनाच्या कालावधीतील पूर्ण वेतन अदा केले जात होते.

न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत त्यास निलंबित ठेवण्याची तरतूद आता अस्तित्वात नाही. सद्यस्थितीत शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.१४.१०.२०११, शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.३१.०१.२०१५ व शासन निर्णय, सा.प्र.वि. दि.०९.०७.२०१९ मधील तरतूदीनुसार न्यायालयीन प्रकरणाचा/विभागीय चौकशी प्रकरणाचा अंतिम निर्णय होण्यापूर्वी निलंबनाचा आढावा घेऊन सक्षम प्राधिकारी पुन:स्थापनेबाबतचा समुचित निर्णय घेतात.
(४) व ( ५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी मेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेल्या ट्रॅफिक वार्डन यांच्या नेमणुकाबाबत

**(२६) ४९५४५ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी मेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने ८०० हून अधिक ट्रॅफिक वार्डन उपलब्ध करून दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ अखेर अशाप्रकारे एकूण किती वार्डन उपलब्ध करून देण्यात आले आहेत,
(३) असल्यास, या वार्डनना एकूण किती मानधन/वेतन देण्याचे ठरले आहे आणि हा खर्च कोणाकडून केला वा करण्यात येणार आहे, तसेच या वार्डनच्या नेमणुका करताना कोणते निकष लावण्यात आले आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२३) :** (१) हे, अंशत: खरे आहे.
(२) व (३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत माण–हिंजेवडी ते शिवाजी नगर या मेट्रो प्रकल्पाचे काम पीपीपी तत्वावर पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या कंपनीमार्फत सुरु असून मे. टाटा प्रोजेक्ट लि. या कंत्राटदारामार्फत शिवाजीनगर ते हिंजवडी मार्गिका क्र. ३ चे काम सुरु आहे. सदर कामाच्या ठिकाणी मे. टाटा प्रोजेक्ट लि.यांचेकडून वॉर्डन नेमणूकीकरीता दोन वेंडर्स नेमण्यात आले असून त्यांचेमार्फत २३८ वॉर्डन्स (मार्शल) (६ सुपरवायझरसह) ची नियुक्ती करण्यात आली आहे. सुपरवायझरला रु. २२,५४६/- तर वॉर्डनला रु.२१,६५४/-इतके वेतन वेंडरमार्फत देण्यात येते.

तसेच, महामेट्रो, पुणे यांच्यामार्फत करण्यात येत असलेल्या मेट्रो मार्गिकेच्या क्षेत्रात मे. टाटा प्रोजेक्ट लिमिटेड व नागार्जुन कंन्सट्रक्शन लिमिटेड या कंपन्यांमार्फत दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ अखेर पर्यंत १८५ ट्राफिक वार्डनसची केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या किमान वेतन नियमानुसार ट्राफिक सुपरवायझर यांना रु.३१,७२३/- तर ट्राफिक वार्डनस्ना दरमहा रु.२८०६४/- वेतन अदा करण्यात येत असून, जयकुमार इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी लिमिटेड या कपंनी मार्फत ट्राफिक सुपरवायझर दरमहा रु. २५९८०/- तर ट्राफिक वार्डन्सना रु. २३,६४०/- इतके वेतन अदा करण्यात येत आहे. उक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करताना, १० वी पास, सुदृढ बांधा तसेच वैद्यकीयदृष्टया तंदूरस्त व पुर्वानुभव असलेल्या इत्यादी अर्हता प्राप्त असलेल्या व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना ट्राफिक पोलिसांकडून वाहतूक नियमांचे प्रशिक्षण देण्यात येते.

---

**मौजा विसापुर-भिवकुंड (जि.चंद्रपूर) येथील नागरिकांना मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(२७) ४९५८८ (२७-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा विसापुर-भिवकुंड (जि.चंद्रपूर) येथील सन १९८६ मध्ये आलेल्या महापुरानंतर नागरिकांचे पुनर्वसन भिवकुंड येथे करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवकुंड येथे पुनर्वसन करण्यात आल्यानंतर नागरिक तेथे राहायला गेले असता त्यांना त्याठिकाणी कोणत्याही मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात आलेल्या नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिसरातील नागरिकांचे योग्यरीत्या पुनर्वसन न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुनर्वसित नागरिकांना मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२३) :** (१), (२) व (३) सन १९८६ रोजीच्या पुरामुळे बाधित झालेल्या मौजे विसापूर भिवकुड जि. चंद्रपूर गावांचे पुनर्वसन भिवकुंड येथे करण्याचे प्रस्तावित होते. तथापि याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडे कोणतेही अभिलेख उपलब्ध नाही. मात्र विसापूर येथील ज्येष्ठ नागरीकाकडे याबाबत विचारणा करण्यात आली असून यांचे पुनर्वसन भिवकुंड येथे प्रस्तावित होते, परंतु मौजे विसापूर येथील नागरिकांनी पुनर्वसित होण्याबाबत अनास्था दर्शविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत कारमध्ये मागील सिटवर बसून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सीट बेल्ट लावणे बंधनकारक केल्याबाबत

**(२८) ४९६३५ (१८-०१-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये १ नोव्हेंबर, २०२२ पासून कारमधून प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला सीटबेल्ट लावणे बंधनकारक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या वाहनांमध्ये मागील सीटवर बेल्टची व्यवस्था नाही त्यांना १५ दिवसांची मुदत दिलेली होती ती ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी संपली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीअंती मुंबईतील रस्त्यांवर होणारे अपघात रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय,

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) दिनांक ०१.११.२०२२ रोजी वृत्तपत्रांमध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

केंद्रींय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम, १२५(१) व नियम १२५(१)(अ)नुसार सर्व वाहनांत सुरक्षा पट्टा बसविणे अनिवार्य आहे.

(२), (३) व (४) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयास परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक १९.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये ज्या सार्वजनिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनात

जर अशी सुविधा उपलब्ध नसेल तर अशी वाहने जेव्हा योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी कार्यालयात येतील त्यावेळेस त्यांच्याकडून उक्त बाबींची पूर्तता करुन घेऊनच वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करुन देण्यात यावे. रत्स्यावरील अंमलबजावणीच्या वेळेस वाहन चालक अथवा त्यातील प्रवासी सुरक्षापट्टा न वापरता वाहनाचा वापर करीत असताना निदर्शनास आल्यास मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९४(ब) च्या उपकलम १ मधील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

---

## धुळे शहरातील रस्त्यांवर खड्डे पडल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असल्याबाबत

**(२९) ४९७७५ (२०-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) शहरातील अनेक भागात रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना येता जाताना त्रास सहन करावा लागत असून अपघातांचे प्रमाणही वाढले असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, शहरातील रस्त्यांचे सहा ते सात वर्षांपासून तर काही रस्त्यांचे सुमारे पंधरा वर्षापासून डांबरीकरण व नूतनीकरण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी माहिती घेऊन या रस्त्यांची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे शहरात सद्यस्थितीत सुमारे ८८५ कि.मी. लांबीचे कच्चे व पक्के रस्ते आहेत. शहरात भूमिगत गटार योजनेचे काम सुरु असल्याने बहुसंख्य रस्ते नादुरुस्त स्थितीत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) शहरातील रस्त्यांच्या डागडुजीसाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

तसेच, सुवर्ण जयंती नगरोत्थान व मुलभूत सोयी सुविधा योजनेअंतर्गत शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून शहरातील मुख्य रस्त्यांची कामे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

शहरातील रस्ते दुरुस्तीबाबत महानगरपालिकेमार्फत नियमित कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन ठाणे या विस्तारित रेल्वे स्थानकामुळे बाधित होणारे मनोरुग्णालयातील महिला विभागाचे वॉर्ड ठाणे महापालिकेकडून बांधण्याबाबत

**(३०) ४९८६५ (२०-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेवर नवीन ठाणे या विस्तारित रेल्वे स्थानकासाठी काही जागा हस्तांतरित करण्यात येत असल्याने या जागेमध्ये बाधित होणारे मनोरुग्णालयाचे ८, ९ व १० हे महिला विभागाचे वॉर्ड ठाणे महापालिकेकडून बांधण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच परिसरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या ठाणे विस्तारित रेल्वे स्थानकाचे काम लवकरात लवकर पुर्णत्वास नेण्यासंदर्भात काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) नवीन उपनगरीय रेल्वे स्थानकासाठी प्रादेशिक मनोरुग्णालयाची १४.८३ एकर इतकी जागा आवश्यक आहे. या जागेमध्ये येणारे ३ महिला रुग्ण कक्ष क्र. ८, ९ व १० हे बाधीत होत असल्याने त्याची पुनर्बांधणी प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जागेमध्येच निम्हांसच्या धर्तीवर आधारित तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रादेशिक मनोरुग्णालयाची स्थानकाकरिता आवश्यक असलेली जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये सुनावणी सुरू असून याबाबत अद्याप मा.उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाले नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील मालेगांव कॅम्प परिसरातील सांडपाण्याची व्यवस्था व निचरा योग्य प्रकारे होत नसल्याबाबत

**(३१) ५०२०६ (२०-०१-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मालेगांव कॅम्प भागातील समर्थनगर, साकार क्लासेस प्रजापिता ब्रम्हकुमारी परिसरात सांडपाण्याची व्यवस्था, निचरा योग्यप्रकारे होत नसल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका दुर्लक्ष करीत असल्याने सांडपाण्याची व्यवस्था नीट होत नसल्यामुळे गटारीजवळ पाणी साचून त्याला नदीचे स्वरुप आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत नागरिकांकडून तक्रारी करण्यात येवूनही त्याकडे महाननगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त परिसरातील समस्यांचे निराकरण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मालेगाव कॅम्प समर्थनगर, साकार क्लासेस प्रजापिता ब्रम्हकुमारी या परिसरातील सांडपाणी वाहून नेणारी अस्तित्वातील ४० वर्ष जुनी गटार ही खाजगी जागेतून जात होती. माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये जागा मालकाने जागेला कंपाऊंड केल्याने वाहून जाणारे सांडपाणी वाहणे बंद झाले. पर्यायाने परिसरातील गटारीत पाणी साचले. तसेच, त्याचवेळी झालेल्या अति पावसामुळे रस्त्यावर काही प्रमाणात पाणी साचले होते.
(३) व (४) सदर ठिकाणचे सांडपाणी निकासासाठी संबंधित जागा मालकाशी बोलणे करुन त्यांच्या जागेतून तात्पुरती भुयारी गटार करण्यास परवानगी मागण्यात आली. परंतू त्यांनी नकार दिला. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत सदर जागा मालक व इतर मिळकत धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५५/१ व २ नुसार नोटीसा बजावण्यात आल्या. त्यापैकी एका मिळकत धारकाने सहमती दर्शविल्याने भुयारी गटार टाकून परिसरातील सांडपाणी निचरा करण्यात आलेला आहे व नागरीकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

तसेच, या परिसरातील सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी रु.१.२० कोटी प्राकलन रकमेची भुयारी गटारीच्या कामाची ई-निविदा महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी महानगरपालिका प्रशासनाने उर्वरित नळ जोडणीची उद्दीष्टये पुर्ण करण्याबाबत

**(३२) ५०२२४ (२०-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहराला पाणी वितरणासाठी नवीन पाईपलाईन टाकून नवीन नळ जोडणी देण्याची मोहीम गत वर्षभरापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी मनपा प्रशासनाने ५५ हजार नवीन नळ जोडणीचे उद्दिष्ट ठेवून शास्ती योजना लागू करुनही आतापर्यंत केवळ १८ हजार नवीन नळ जोडणीचे काम पूर्ण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उर्वरीत नळ जोडणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

परभणी शहर महानगरपालिके मार्फत आज पर्यंत शहरात एकूण २९२१८ नवीन नळ जोडणी देण्याचे काम पूर्ण झाले आहे.
(३) उर्वीरत नळ जोडणीसाठी महानगरपालिके मार्फत मुदत वाढवून देण्यात आली आहे. तसेच शहरात जन जागृती करण्यात येत आहे. आवश्यकते प्रमाणे प्रभाग समितीनुसार नळ कारागीर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मातंग समाजातील पिडीत कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत देण्याबाबत

**(३३) ५०३६६ (१८-०१-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साळेगांव (ता.केज जि.बीड) येथील श्री.संजय ज्ञानोबा ताकतोडे यांनी मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळण्याकरिता माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जलसमाधी घेतली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सदर प्रकरणात मातंग समाजामध्ये तीव्र असंतोष पसरल्यामुळे श्री.संजय ताकतोडे यांचे शव ताब्यात घेतले नव्हते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. मुख्यमंत्री तत्कालिन पालकमंत्री यांनी मा.जिल्हाधिकारी, बीड यांना निर्देश देऊन दहा लक्ष रुपये आर्थिक मदत देण्याचे लेखी आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पिडीत कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.संजय ज्ञानोबा ताकतोडे, मौ.साळेगांव, ता.केज, जि.बीड यांनी दि.०५ मार्च, २०१९ रोजी बीड येथील बिंदुसरा धरणात उडी मारुन जलसमाधी घेतली.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.०९.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये आर्थिक मदत जाहिर केली होती.

(४) जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री सचिवालय (निधी कक्ष) यांचेकडे प्रकरण विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील तलाव व बोळयाचे पर्यावरणदृष्टा संवर्धन होण्यासाठी विविध विकास कामे मंजूर करण्याबाबत

**(३४) ५०४०२ (२३-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली शहरातील तलाव व बोळयामूळे प्रदुषणाचा फैलाव मोठया प्रमाणात होत असल्यामूळे पर्यावरणीयदृष्टा संवर्धन होण्यासाठी ब्रम्हपूरी नगरपरिषद क्षेत्रातंर्गत लेंडारा तलावाचे पर्यावरणीयदृष्टा संवर्धन करण्यासाठी विविध विकास कामे करणे, सिंदेवाही नगरपंचायत क्षेत्रातंर्गत लेंडारा बोळीचे पर्यावरणीय दृष्टा संवर्धन करण्यासाठी विविध विकास कामे करणे व सावली नगरपंचायत क्षेत्रातंर्गत लेंडारा तलावाचे पर्यावरणीय दृष्टा संवर्धन करण्यासाठी विविध विकास कामे करणे याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व पर्यावरण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, ब्रम्हपूरी, सिंदेवाही व सावली शहरातील तलाव व बोळयाचे पर्यावरणदृष्टया संवर्धन होण्यासाठी विविध विकास कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०२३) :** (१), (२) व (३) सदरबाबत लोकप्रतिनिधी यांचे दि.९ ऑक्टोंबर,२०२२ रोजीचे मा.मंत्री (पर्यटन, कौशल्य विकास आणि उद्योजकता) यांना सादर केलेले लेखी निवेदन (पत्र) विभागास दि.१८.११.२०२२ रोजी प्राप्त झाले होते.

सदरच्या अनुषंगाने, मुख्याधिकारी, ब्रम्हपूरी नगरपरिषद, मुख्याधिकारी, सावली नगरपंचायत आणि मुख्याधिकारी, सिंदेवाही नगरपंचायत यांना राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत दि.२७.०८.२००८ रोजीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सदर तलावांच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल विभागास सादर करणेबाबत दि.०५.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अत्याचार निर्मूलन विशेष कायदा १९८९ अंतर्गत बंधनकारक असतांनाही राज्यस्तरीय समिती अद्याप स्थापन न केल्याबबात

**(३५) ५०४१५ (२३-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जातीवरुन होणारा अत्याचार थांबविण्यासाठी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार निर्मूलन विशेष कायदा सन १९८९ मध्ये अंमलात येवून त्याअंतर्गत सन १९९५ ला नियम तयार करण्यात आले व त्यानंतर २०१६ मध्ये सदर नियम सुधारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्याच्या कलम १६ नुसार, राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समिती गठीत करुन दरवर्षी माहे जानेवारी व माहे जुलैमध्ये बैठकी घेणे समितीला बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील गृह विभागाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजीचे पत्र आणि सामाजिक न्याय विभागाचे दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजीचे पत्र पाहता, सदर प्रकरणी अद्यापही समिती गठीत झाली नसल्यामुळे समितीच्या बैठकाही झाल्या नसल्याचे दि. ४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात जातीवरुन अत्याचाराच्या दिवसेंदिवस होणाऱ्या वाढत्या घटना लक्षात घेता, कायद्यानुसार समिती स्थापन करणे बंधनकारक असतांनाही अद्याप समितीचे गठन न होण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्तप्रकरणी समिती गठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) राज्यस्तरावर मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरी उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समिती गठीत करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तथापि कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे तसेच सन २०२२ मध्ये नव्याने सरकार स्थापन झाल्यामुळे या कार्यवाहीस विलंब झालेला आहे.

---

## धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी लाच घेऊन बोगस लसीकरणाचे प्रमाणपत्र वाटप केल्याबाबत

**(३६) ५०८६३ (२०-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी ५०० रुपयाची लाच घेऊन जवळपास ८ ते १० हजार बोगस लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्राचे वाटप केल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने किती प्रकरणे उघडकीस आली आहेत व त्यानुषंगाने संबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे शहरातील एस.व्ही.के.एम. कॉलेज या कोविड लसीकरण केंद्रावर दि.०४/१२/२०२१ ते दि.०६/१२/२०२१ या कालावधीत ३९९१ इतके बोगस लसीकरण प्रमाणपत्र वाटप झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) या प्रकरणी धुळे महानगरपालिकेचे उपायुक्त यांनी प्राथमिक चौकशी केली आहे. त्यानुसार, महानगरपालिकेमार्फत धुळे शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आलेली असून, याबाबतची मुळ कागदपत्रे पोलिस विभागास उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(३) या प्रकरणी पोलीस विभागाकडून तपास व पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील मासुंदा तलावासाठी करोडो रुपयांचा निधी खर्च करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(३७) ५०९०६ (२७-०१-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील मासुंदा तलावासाठी गेल्या १० वर्षात करोडो रुपयांचा निधी खर्च करून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीअंती मासुंदा तलावाच्या सुशोभीकरणाकरीता गत १० वर्षात किती निधी खर्च करण्यात आला असून, सदरहू निधी कोणत्या एजन्सीला, कोणत्या कामासाठी व किती वर्षाच्या कालावधीकरीता देण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उक्त गैरव्यवहार केलेल्या महानगरपालिकेतील संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार, महानगरपालिका क्षेत्रातील सर्व तलावांची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील मासुंदा तलाव क्षेत्रात मागील १० वर्षात विविध स्थापत्य कामे, विद्युत कामे, उद्यान कामे करण्यात आली आहेत. सदर कामांअंतर्गत ॲम्पी थिएटर, पदपथ नुतनीकरण, छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाच्या परिसराचे सुशोभिकरण, सुरक्षेसाठी रेलिंग्स लावणे इ. कामे आर्थिक तरतुदीची उपलब्धता विचारात घेऊन टप्पेनिहाय, सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीनंतर पुर्ण करुन घेण्यात आल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर कामांसाठी महानगरपालिकेच्या स्वनिधी, स्मार्टसिटी अभियानातील अनुदान, राज्य शासनाकडून प्राप्त निधीच्या माध्यमातून खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माहिती व जनसंपर्क महासंचालनाच्या प्रलंबित प्रकरणांची चौकशी करण्याबाबत

**(३८) ५०९६८ (२२-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनाच्या सन २०१७ ते २०२१ या कालावधीतील संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुण निर्णय देण्याबाबत आणि नस्ती गहाळ प्रकरणी नजीकच्या मरीन ड्राईव्ह पोलिस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग यांनी दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास संचालक, (माहिती) (प्रशासन) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे तत्कालीन संचालक श्री.अजय अंबेकर यांच्यावर फौजदारी आणि आर्थिक अनियमिताबाबत गुन्हे दाखल करुन त्यांच्यासह इस्त्रायल दौऱ्यांवर गेलेल्या अन्य ४ अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करुन कारवाई करण्याबाबत दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री महोदयांना लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे याचा आढावा महासंचालनालयाने घेतला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक १०.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे नस्ती गहाळ प्रकरणी तक्रार करण्यात आली आहे.
(४) होय, याविषयी महासंचालनालयाने आढावा घेतला असून मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे महासंचालनालयाकडून या विषयाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेमधील गैरव्यवहार व अनियमिततेबाबत

**(३९) ५१०८४ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील येथील नगरपरिषदेमधील एकूण ४ प्रकरणांमध्ये गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे संपूर्ण कागदोपत्री पुराव्यासह जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे चौकशी व सुनावणी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी व सुनावणी झालेली असतांना देखील संबंधित दोषीवर कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे सदर निर्णय हे जिल्हाधिकारी, बीड यांनी राखून ठेवले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी त्वरीत निर्णय देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिलेल्या निवेदनाद्वारे शासनाने सत्वर चौकशी करून निर्णय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही,
सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्या न्यायालयात सुनावणी घेण्यात येवून, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची नावे निश्चित करुन त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत दि.०२ सप्टेंबर, २०२२ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत.
(३) हे अंशतः खरे आहे,
स्थानिक लोकप्रतिनिधी श्री. शेख रहीम शेख रज्जाक व श्री. सारंग अरुण पुजारी, नगरसेवक, अंबाजोगाई नगरपरिषद यांनी दि.२४ नोव्हेंबर, २०२१ रोजी निवेदन सादर केले होते.
(४) अंबाजोगाई नगरपरिषदेमधील गैरव्यवहार व अनियमितता झाल्याबाबत दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्या न्यायालयात सुनावणी घेण्यात येऊन, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची नावे निश्चित करुन

त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाचा संयुक्त अहवाल सादर करण्याबाबत दि.०८ ऑगस्ट, २०२२ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील आरे मेट्रोच्या कारशेडला विरोध होत असल्याबाबत

**(४०) ५११०५ (२०-०१-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोरेगाव येथील आरे जंगलातील मेट्रोच्या कारशेडसाठी मोठया प्रमाणावर झाडे तोडण्यात येत असल्यामुळे आदिवासी व वन्य प्राण्यांच्या अधिवास धोक्यात येत असल्यामुळे पर्यावरणप्रेमी व आदिवासी यांनी दिनांक ७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करुन सदरील प्रकल्पाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदरील प्रकरणी निर्णय घेवून मुंबई परिसराचे वातावरण संतुलित ठेवणाऱ्या आरे येथील जंगलाचे संरक्षण, संवर्धन करण्याकरीता मेट्रो कारशेड आरे येथे न करता अन्य ठिकाणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
आरे कॉलनीतील मेट्रो कारशेडला बाधित होणारी झाडे वृक्ष प्राधिकरण व मा. उच्च न्यायालय यांचे परवानगीनुसार सन २०१९ मध्ये कापण्यात आली आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीत रॅम्प येथील शंटींग नेक मध्ये बाधित ८४ झाडे तोडण्याच्या अर्जावर स्वतंत्रपण निर्णय घेण्याचे वृक्ष प्राधिकरणाला आदेश दिले आहेत. मेट्रो कारशेडच्या जागेवर कोणत्याही प्रकारचा आदिवासी वा वन्य प्राण्यांचा अधिवास असल्याचे दिसून येत नाही.
(२) केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालय यांनी दि. १७ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कांजूरमार्ग येथील एकत्रित डेपोमुळे मेट्रो मार्ग-३ चे संचालन आणि देखभाल करणे यातील तांत्रिक आव्हाने निदर्शनास आणून दिली असल्याने शासनाने आरे दुग्ध वसाहत येथेच कारशेड डेपो उभारणीस मंजूरी दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनपुरवठयासाठी काढण्यात येणाऱ्या निविदांना घातलेल्या अटींबाबत

**(४१) ५१२६० (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या मुला मुलींच्या वसतीगृहाच्या विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासाठी काढल्या जाणाऱ्या निविदासाठी ५० कोटीची आर्थिक उलाढालीची अट ठेवण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६ च्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ४ टक्के वसतीगृह व निवासी शाळेतील भोजन पुरवठा हा अनुसूचित जाती निविदा धारकांसाठी आरक्षित ठेवणे गरजेचे असताना शासनाच्या उपरोक्त निर्णयामुळे अनुसूचित जातीतील एकही निविदाधारक अटीमध्ये बसू शकत नाही तसेच अनेक बेरोजगार संस्था व बचत गट निविदा भरू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबीचा विचार करून शासन उपरोक्त निर्णयामध्ये शिथिलता आण्णार आहे काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील नवीन पदांना मंजुरी मिळण्याबाबत

**(४२) ५१३२४ (२२-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकीय, तांत्रिक व लेखा सेवा विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणा बळकट करण्याच्या दृष्टीने मंजूर पदसंख्या पैकी ४१४ पदे व्यपगत करून ३८७ नवीन पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन पद निर्माण केल्यास आस्थापना खर्चात वाढ होणार नाही तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची निकड लक्षात घेता नवीन पदांची निर्मिती करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावावर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) अन्वये २५४ पदे नव्याने निर्माण करण्यास दिनांक ३०.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित मर्यादेपक्षा अधिक आहे. तथापि, शहराच्या वाढता नागरीकरणाच्या गरजा व अत्यावश्यक सेवाभरतीचा विचार करता, सदर प्रस्तावास केवळ एक वेळची विशेष बाब म्हणुन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) नागरी वस्तीमध्ये डम्पींग ग्राऊंड सुरू केल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाल्याबाबत

**(४३) ५१३६४ (२७-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाने ठेकेदारामार्फत शहरातून गोळा करण्यात येणारा कचरा खडक रोड, शिवाजीनगर या नागरी वस्तीमध्ये डम्पींग करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागात कचरा टाकल्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्यामुळे नागरिकांनी व तेथील दुकानदारांनी याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी शहर महानगरपालिकेकडे स्वतच्या मालकीचे डम्पींग ग्राऊंड नसल्याने महापालिकेच्या सदर जागेवर डंम्पीग करण्यास सुरूवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरविषयी नागरिकांनी महापालिका प्रशासनाच्या आरोग्य विभागाकडे तक्रारी केल्या असून, याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन, संकलन व वहन करण्यासाठी घंटागाडीद्वारे घरोघरी कचरा संकलन करुन तात्पुरत्या स्वरुपात कचरा ट्रान्सफर स्टेशन येथे संकलित करण्यात येतो. तद्नंतर मोठ्या क्षमतेच्या आर.सी.वाहनांद्वारे चांविद्रा येथे पुढील प्रक्रियेसाठी कचरा पाठविण्यात येतो.

सद्यस्थितीत कचरा संकलनासाठी खडक रोड, शिवाजी नगर येथे तात्पुरते ट्रान्सफर स्टेशन असून या ठिकाणी कोणतेही डंपिंग ग्राऊंड नसल्याची बाब भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, कचरा प्रक्रिया केंद्र जागेबाबत स्थानिक नागरिकांचा रोष पाहता, पर्यायी शासकीय जागा उपलब्ध होण्याकरिता जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे महानगरपालिका स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच भविष्यात शहरामध्ये ५ ठिकाणी अद्ययावत ट्रान्सफर स्टेशन बांधण्यात येत असल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबेजोगाई (जि.बीड) येथील वक्फ संस्था बेकायदेशिररित्या खालसा घोषीत केल्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत

**(४४) ५१३८७ (२२-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबेजोगाई, (जि.बीड) येथील वक्फ संस्था जुम्मा मस्जीदची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्रात/शुध्दीपत्रकात असून सदरील सेवा ईनाम जमीन संबंधीत गैरअर्जदार यांनी बेकायदेशिररित्या हैद्राबाद ईनाम निर्मुलन कायदा अंतर्गत रद्द केल्याचे घोषित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील खालसाचे आधारे जमिन हस्तांतरीत करण्यात आलेली असून सदरील खालसा करून घेणारे व खालसा करीता प्रकरण दाखल करणारे यांचेविरुध्द नियमानुसार खालसाचे आदेशानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी प्राधिकृत करण्यात यावे अशी मागणी जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अंबाजोगाई येथील वक्फ संस्था जुम्मा मस्जीदच्या संबंधीत असलेली मिळकत गट न.६५ संबंधी बेकायदेशिररित्या खालसा घोषीत केल्यानुसार सर्व संबंधितावर तातडीने गुन्हे दाखल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अल्पसंख्यांक मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

सन १९७४ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या राजपत्रात जुम्मा मस्जिद, अंबेजोगाई (जि.बीड) या वक्फ संस्थेची नोंद असून सदर राजपत्रात तसेच सन २००६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या शुध्दीपत्रकात वक्फ संस्थेच्या मालमत्तांचा तपशील नमूद करण्यात आलेला आहे.

त्यापैकी सर्वे नं.५०२ व ५०३/२ ही मालमत्ता मदतमाश इनाम असल्याबाबत (वक्फ नसल्याबाबत) उपजिल्हाधिकारी (सामान्य), बीड यांनी दिनांक १९.०५.२०१७ रोजी पारित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणातील आरोपींना कायद्यानुसार शिक्षा करण्याबात वक्फ मंडळामार्फत मुख्यदंडाधिकारी, अंबाजोगाई येथील दिवाणी न्यायालयामध्ये फौजदारी दावा क्रमांक ४८३/२०२० दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) अशंत: खरे आहे.

गट क्र. ६५ ही मालमत्ता जुम्मा मस्जिद, अंबेजोगाई या वक्फ संस्थेची नसून दर्गाह हजरत शेख किरमानी या वक्फ संस्थेची असल्याबाबत सन १९७४ च्या राजपत्रात उल्लेख आहे.

सदर मालमत्ता खालसा करणाऱ्याविरुध्द गुन्हे दाखल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे.मालमत्तेबाबत झालेल्या कार्यवाही संबंधात गुन्हे दाखल करण्याची मागणी प्राप्त झाली आहे.

(४) गट नं.६५ मधील मालमत्ता खालसा झाल्याचे कोणतेही आदेश वक्फ मंडळाच्या अभिलेख्यामध्ये आढळून आलेले नाही. तथापि, दिवाणी न्यायालय येथील दावा क्र.८१/७५ मधील आदेशानुसार सदर मालमत्ता वक्फ नसल्याबाबत आदेशित केलेले आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत वक्फ मंडळास कळविण्यात आले आहे.

---

**मराठवाड्यातील थोर साहित्यीक, विचारवंत व शिक्षणतज्ञ कै.नरहर कुरुंदकर यांचे स्मारक उभारण्यास निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(४५) ५१४८३ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील थोर साहित्यीक, विचारवंत व शिक्षणतज्ञ कै.नरहर कुरुंदकर यांचे नांदेड येथे स्मारक उभारण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी नांदेड यांनी स्मारक बांधकामाचा तसेच निधी मंजूरीचा प्रस्ताव दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मारकाच्या उर्वरित बांधकामास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :** (१), (२) व (३) होय.

दिनांक २० मार्च, २०१३ रोजी स्मारकास रु.२००.०० लक्ष इतक्या रकमेच्या मुळ प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून, या कामास सन २०१६ पर्यंत रु.२००.०० लक्ष इतकी संपूर्ण रक्कम वितरीत करण्यात आली आहे. फेब्रुवारी, २०२२ मध्ये प्राप्त झालेला प्रस्ताव अतिरिक्त कामाचा आहे.

(४) स्मारकाच्या अतिरिक्त कामाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने या विभागाने दि.१२.१०.२०२२ पत्रान्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे माहिती मागविण्यात आली आहे.जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून माहिती अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर (जि. जळगाव) नगरपालिकेकडून होणारी अवास्तव कर आकारणीबाबत

**(४६) ५१५०५ (२२-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) नगरपालिका हद्दीत सन २०२२-२३ ते २०२५-२६ ही चतुर्थ कर आकारणी हद्दीतील व हद्दी बाहेरील मालमत्तेची अवास्तव कर आकारणी केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नगरपालिकेकडून केली जाणारी अवास्तव कर आकारणी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

रावेर नगरपरिषद हद्दीतील मालमत्तांकरीता सन २०१६-१७ मध्ये चतुर्थ वार्षिक कर आकारणीसाठी लागू असलेले दर कायम ठेवण्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. २५, दि.१३.०७.२०२१ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे रावेर नगरपरिषद हद्दीतील जुन्या मालमत्तांकरीता कोणत्याही कराची वाढ केलेली नाही.

सन २०२१-२२ या वर्षात नगरपरिषद हद्दीतील व वाढीव हद्दीतील मालमतांकरीता चतुर्थ कर आकारणी प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली होती. परंतु, सदर कर आकारणीस मुदतवाढ न मिळाल्यामुळे सदर प्रक्रिया सन २०२२-२३ या वर्षात पुर्ण करण्यात येत आहे. यानुसार रावेर नगरपरिषदेच्या जुन्या हद्दीतील मालमत्ता कराच्या दराप्रमाणे नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीतील मालमतांकरीता ६०% प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मागासवर्गीयांच्या महामंडळावर आयएएस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्याबाबत

**(४७) ५१५५९ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ या मागासलेल्या समाजांच्या कल्याणासाठी असलेल्या महामंडळांचे "व्यवस्थापकीय संचालकपद" हे नियमावलीनुसार आयएएस अधिकाऱ्यांकडे देणे आवश्यक असताना उपसचिव, सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आयएएस अधिकाऱ्यांच्या नियुक्ती केल्या नसल्याने या मंडळाच्या विविध योजनांची ठोसपणे अंमलबजावणी होत नसल्याने शासनाने याप्रकरणी चौकशी करुन आयएएस अधिकऱ्यांच्या मागसवर्गीय महामंडळावर नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) व (२) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदी भा.प्र.से. संवर्गाचे व्यवस्थापकीय संचालक आहेत, तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदी सहसचिव दर्जाच्या व्यवस्थापकीय संचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या कार्यकाळात महामंडळाच्या भागभांडवलात वाढ करण्यात आली आहे. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ ही पदे भाप्रसेची संवर्ग पदे म्हणुन घोषित करण्यात आलेली नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इस्त्रायल देशाच्या अभ्यास दौऱ्यामध्ये प्रशासकीय व वित्तीय त्रुटी आढळून आल्याबाबत**

**(४८) ५१५९५ (२३-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे सेवानिवृत्ती संचालक श्री.अजय अंबेकर यांनी सेवेत कार्यरत असताना आयोजित करण्यात आलेल्या इस्त्रायल देशाच्या अभ्यास दौ-यासंबंधी शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११, दि.२९/१२/२०१४ मधील विहित अटी व शर्तीचे पालन केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच याबाबत विविध प्रकारच्या प्रशासकीय व वित्तीय त्रुटी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती फौजदारी कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२३) :** (१), (२), (३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११, दि.२९.१२.२०१४ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले नाही.
तथापि, काही प्रशासकीय त्रुटी विषयी चौकशी करण्याकरिता श्री. अजय अंबेकर, तत्का. संचालक (माहिती) (प्रशासन) यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ खाली दोषारोपपत्र बजावण्यासाठीच्या प्रारूपास मान्यता घेण्यासाठी नस्ती शासनास सादर करण्यात आली आहे.
(४) शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर दोषारोप पत्र बजावण्यात येईल.

---

**सामाजिक न्याय विभागातील सहआयुक्त पद भरण्याबाबत**

**(४९) ५१६६० (२५-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागातील श्री.आर.डी.अत्राय यांना सहआयुक्त, समाजकल्याण या पदावर १ दिवसांसाठी पदोन्नती दिली असल्याचे व त्याच दिवशी सेवानिवृत्त झाले असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच सामाजिक न्याय या महत्वाच्या विभागातून सर्व कामे केली जात असताना सहआयुक्त पदाच्या ४ जागा असूनही ती भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
श्री. आर. डी. अत्राम यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रकरणी दि. ०३.०१.२०२२ रोजी अंतीम निर्णय झाला. तसेच पदोन्नतीस आवश्यक असणारी माहिती व मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल इत्यादी माहिती आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यात आली व प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत आस्थापना मंडळापुढे ठेवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला. तसेच आस्थापना मंडळाने केलेल्या

शिफारशीनुसार प्रस्तावास शासन मान्यता घेऊन श्री. अत्राम यांचे पदोन्नतीचे आदेश दि. ३०.०८.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आले.

(२) सहआयुक्त संवर्गामध्ये उपायुक्त संवर्गातून पदोन्नती देण्यात येते. उपायुक्त संवर्गाची दि. ०१.०१.२०१४ रोजी सेवा ज्येष्ठतायादी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार सहआयुक्त संवर्गात पदोन्नतीसाठी दोनच अधिकारी उपलब्ध होत होते. त्यापैकी एका अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु असल्याने श्री. आर. डी. अत्राम हे एकमेव अधिकारी पदोन्नतीस पात्र ठरले.

(३) सहआयुक्त संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याच्या अनुषंगाने आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ०१.०८.२०१९ मधील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून राबविण्याचा घेतलेला निर्णय

**(५०) ५१७०० (२७-०१-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सुमारे १८ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीतून कोणकोणते प्रकल्प राबविण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामास सुरुवात झाली आहे काय,

(४) असल्यास, सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०३-२०२३) :** (१) (२), (३) (४) सदर निधीतून पुढील प्रकल्प राबविण्यात येणार आहेत :-

१) कोपरी पटणी पूल, २) गायमुख ते ठाणे आणि भिवंडी जोडणारे पूल, ३) ठाणे कोस्टल रोड (टप्पा २), ४) ऐरोली बोगदा ते कटाई नाका रोड, ५) पालघरमध्ये रस्ता रुंदीकरण – (अ) वसई ते पालघर – नारींगी खाडी पूल (ब) पालघर ते विरार -वैतरणा नदीवरील पूल (क) मनोर ते वाडा कांचड फाटा कुडूस आर्मसहीत रस्ता ६) वाडा-वाशिंद-पडघा, ७) मुरबे-पालघर कनेक्टिव्हिटी,

८) शिळफाटा ते माणकोली, ९) कल्याण ते माणकोली (बापगांव) (अ) गांधारी खाडी पूलाचे रुंदीकरण, (ब) कल्याण गांधीरी ब्रिज ते NH ३ सापे मार्गे, (क) बापगांव जंक्शन ते NH ३ सोनाळे मार्गे,

१०) कल्याण-NRC-टिटवाळा, (अ) आंबिवली NRC ते उंबरणी सर्कल, (ब) उंबरणी सर्कल ते निमकर नाका टिटवाळा स्टेशनमार्गे, (क) वाजपाई चौक ते निमकर नाका, ११) टिटवाळा ते पडघा, १२) महापे-दहिसर बोगदा,१३) दहिसर ते मुरबाड रोड, १४) टिटवाळा ते बदलापूर, १५) तळोजा एमआयडीसी, १६) खारेगाव-पडघा रस्ता सुधारणा, १७) चिंचोटी ते अंजूर फाटा रस्ता

उक्त प्रकल्पांच्या कामामध्ये रस्ता, उड्डाणपुल, खाडीपुल, भुयारी/उन्नत मार्गांचे बांधकाम यांचा समावेश आहे. सदर कामांचा प्राथमिक अभ्यास करुन प्रकल्पनिहाय ढोबळ अंदाजिपत्रक तयार करण्यात आले असून, वरील कामांची ढोबळ अंदाजित एकूण किंमत रु. १७,२१४.७२ कोटी असून, सदर कामांची तांत्रिक व्यवहार्यता, विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे तसेच सदर प्रकल्पांच्या बांधकामाकरीता कंत्राटदाराची नियुक्त करण्यासाठी निविदा प्रपत्रे तयार करणे इत्यादी

कामाकरीता सल्लागार नियुक्तीस मान्यता देण्यात आली आहे. सदर कामांचा तांत्रिक व्यवहार्यता अहवाल २०२३ अखेरपर्यंत अपेक्षित असून, तद्नंतर हाती घ्यावयाच्या कामाकरीता कंत्राटदारांची नियुक्ती प्रक्रिया मार्च, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.